महाराष्ट्र शासन

# अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर.

आदिवासी विकास भवन, आर.टी.ओ. ऑफीस समोर, अमरावती रोड, गिरीपेठ,
नागपूर- ४४००१०

दूरध्वनी क्र.२५६०३१४ फॅक्स क्र.२५६५००८

E_mail : atcnagpur@yahoo.co.in

## जाहिरात

अपर आयुक्त, आदिवासी विकास नागपूर हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील नागपूर, भंडारा, देवरी, चंद्रपूर, चिमूर, गडचिरोली, अहेरी व भामरागड या प्रकल्पांतर्गत असलेली कार्यालये / शासकीय आश्रमशाळा / शासकीय वसतिगृहातील विविध वर्ग- ३ संवर्गांची रिक्त पदे भरण्याकरिता पात्रता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागवित आहेत.

| अ.क्र | पदाचे नाव | विषय | पद सांकेतांक | रिक्त पदाची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | गृहपाल (स्त्री) | -- | १ | ०२ |
| २ | उपलेखापाल | -- | २ | ०१ |
| ३ | अधिक्षिक (स्त्री) | -- | ३ | ०४ |
| ४ | अधिक्षक (पुरुष) | -- | ४ | ०२ |
| ५ | वरिष्ठ लिपीक | -- | ५ | ०२ |
| ६ | लिपीक टंकलेखक | -- | ६ | ०६ |
| एकुण रिक्त पदांची संख्या | | | | १७ |

टिप:- वर नमुद केलेल्या पद संख्येत, सामाजिक व समांतर आरक्षणात भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर कमी- अधिक बदल होऊ शकतो.

| अ.क्र | संवर्गाचे नांव | भरावयाची पदे |
|---|---|---|
| १. | गृहपाल (स्त्री) | ०२ |
| २. | उपलेखापाल | ०१ |
| ३. | अधिक्षक (स्त्री) | ०४ |
| ४. | अधिक्षक (पुरुष) | ०२ |
| ५. | वरिष्ठ लिपीक | ०२ |
| ६. | लिपीक टंकलेखक | ०६ |
| एकुण | | १७ |

### परीक्षेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | अर्ज करण्याचा दिनांक | १८ ऑगस्ट २०१६ ते ०८ सप्टेंबर २०१६ |
| २ | चालान भरण्याचा शेवटचा दिनांक | ०९ सप्टेंबर २०१६ |
| ३ | प्रवेशपत्र ऑनलाईन करणे | १५ सप्टेंबर २०१६ |
| ४ | परीक्षेचा दिनांक | ३० सप्टेंबर २०१६ |
| ५ | उत्तर तालिका प्रसिध्द करणे | १ ऑक्टोंबर २०१६ |
| ६ | प्रश्न व उत्तरावर आक्षेप नोंदविणे | ५ ऑक्टोंबर २०१६ |
| ७ | गुणवत्ता प्रसिध्दी | २५ ऑक्टोंबर २०१६ |

(डॉ. माधवी खोडे)
अपर आयुक्त
आदिवासी विकास नागपूर. तथा
अध्यक्ष जिल्हा निवड समिती,
नागपूर

१) पदाचे नांव : गृहपाल (स्त्री) वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/-

| अ.क्र. | भरावयाची एकूण पद संख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
| १ | ०२ | सर्व साधारण | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०२ |
| २ | | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | | प्रकल्प/ धरणग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | | अंशकालीन कर्मचारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | | अपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | ०२ | | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०२ |

२) पदाचे नांव : उपलेखापाल वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२००/-

| अ.क्र. | भरावयाची एकूण पद संख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
| १ | ०१ | सर्व साधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २ | | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | | प्रकल्प/ धरणग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | | अंशकालीन कर्मचारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | | अपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | ०१ | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

३) पदाचे नांव : अधिक्षक (स्त्री) रु. ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/-

| अ.क्र. | भरावयाची एकूण पद संख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
| १ | ०४ | सर्व साधारण | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ४ |
| २ | | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | | प्रकल्प/ धरणग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | | अंशकालीन कर्मचारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | | अपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | ०४ | | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ४ |

४) पदाचे नांव : अधिक्षक (पुरुष) रु. ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/-

| अ.क्र. | भरावयाची एकूण पद संख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
| १ | ०२ | सर्व साधारण | ०१ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | २ |
| २ | | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | | प्रकल्प/ धरणग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | | अंशकालीन कर्मचारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | | अपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | ०२ | | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | २ |

### ५) पदाचे नांव : वरिष्ठ लिपिक वेतनश्रेणी रु.५२००-२०२०० ग्रेड पे २४००/-

| अ.क्र. | भरावयाची एकूण पद संख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
| १ | ०२ | सर्व साधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २ | | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | | महिला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४ | | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | | प्रकल्प/ धरणग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | | अंशकालीन कर्मचारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | | अपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | ०२ | | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |

### ६) पदाचे नांव : लिपीक टंकलेखक वेतनश्रेणी रु.५२००-२०२०० ग्रेड पे १९००/-

| अ.क्र. | भरावयाची एकूण पद संख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
| १ | ०६ | सर्व साधारण | १ | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ४ |
| २ | | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | | महिला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ |
| ४ | | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | | प्रकल्प/ धरणग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | | अंशकालीन कर्मचारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | | अपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | ०६ | | २ | ० | ०१ | ०१ | ० | ० | ० | १ | १ | ६ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण एकंदर | ५ | १ | २ | १ | १ | ० | ० | २ | ५ | १७ |

| | |
|---|---|
| पद ज्या वर्गातील व सेवेतील असेल तो वर्ग व ती सेवा: | वर्ग- ३ |
| नोटीस देऊन नियुक्ती समाप्त करण्यात येते काय, असल्यास, कोणत्या शर्तीवर ? | होय, नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार नियुक्ती समाप्त करण्यात येते. |
| (अ) कर्तव्य | नियमानुसार. |
| (ब) उमेदवारांना जेथे सेवा करावी लागेल त्या कार्यालयाचे/कार्यालयांचे ठिकाण/ ठिकाणे | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर विभागातील नागपूर/भंडारा/देवरी/चंद्रपूर/चिमूर/ गडचिरोली/अहेरी/भामरागड या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये / शासकीय वसतिगृहे / शासकीय आश्रमशाळा |
| निवडण्यात आलेल्या उमेदवारांना कामावर केव्हा यावे लागेल ? | नियुक्ती आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत |
| परिविक्षाधिन कालावधी | सर्व पदांवरील नियुक्ती २ वर्षे कालावधीसाठी परिविक्षाधीन म्हणून करण्यात येईल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पुर्ण केल्यानंतरच नियुक्ती नियमित होईल. |
| पदोन्नतीच्या संधी | शासन नियमानुसार |
| आवश्यक शैक्षणिक अर्हता | खालीलप्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| १ | गृहपाल (स्त्री) वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/- | १. समाजकार्य किंवा समाज कल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदव्युत्तर पदवी धारण करणे आवश्यक.<br>२. ज्यांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान आहे. |

| | | |
|---|---|---|
| २ | उपलेखापाल वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००/- | १. जे मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी धारण करीत आहेत परंतु सांविधानिक विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी अथवा शिक्षणशास्त्रातील पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य राहिल.<br>२. MSCIT/DOECC प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक |
| ३ | अधिक्षक(स्त्री) वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/- | १. समाजकार्य किंवा समाज कल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदवी धारण करतात.<br>२. ज्यांना मराठी भाषेचे.पर्याप्त ज्ञान आहे. |
| ४ | अधिक्षक(पुरुष) वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/- | १. समाजकार्य किंवा समाज कल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदवी धारण करतात.<br>२. ज्यांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान आहे. |
| ५ | वरिष्ठ लिपीक वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/- | १. जे मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी धारण करीत आहेत, , परंतू गणित, अर्थशास्त्र, वाणिज्य आणि सांख्यिकीशास्त्र यापैकी एका विषयासह पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना नियुक्तीसाठी प्राधान्य राहील.<br>२. MSCIT/DOECC प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक |
| ६ | लिपीक टंकलेखक वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे १९००/- | १. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण<br>२. (गव्हर्नमेंट कमर्शियल सर्टिफिकेट ) अर्हता धारण करतात<br>टंकलेखन मराठी ३० व इंग्रजी ४० श. प्र. मि. वेग मर्यादा.<br>MSCIT/DOECC प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक |
| समान अर्हतेचा स्वीकार करता येईल काय अशा अर्हता कोणत्या? | | नाही. |
| वयोमर्यादा (कोणतीही असल्यास) | | वरील सर्व पदांसाठी जाहिरात प्रसिध्दीच्या दिनाकांस किमान १८ वर्षे पुर्ण व कमाल सर्वसाधारण उमेदवारासाठी ३८ वर्षे, मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षे |
| राष्ट्रीयत्व | | भारतीय |
| अधिवास | | महाराष्ट्र |

वरील सर्व पदांसाठी शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणी / वापराबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

<u>उमेदवार निवडीची पध्दती</u>

१. पद क्र १ ते ५ पदांकरीता मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दीक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरिता एकूण २०० गुणांची लेखी परिक्षा असेल. पद क्र ६ साठी मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, अंकगणित या विषयावरिल प्रश्नांकरिता एकुण २०० गुणांची लेखी परिक्षा असेल.
२. शासन नियमाप्रमाणे सर्वसाधारण गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने लेखी परीक्षेत एकुण गुणाच्या किमान ४५ % (९० गुण) प्राप्त करणे आवश्यक राहील.

***सर्वसाधारण सूचना--***

१. जाहिरातीत नमुद केलेल्या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय जाहिरात संकेतस्थळावर प्रसीध्दीचा दिनाकांस (म्हणजेच १८.०८.२०१६ रोजीचे) गणले जाईल. उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व कमाल ४३ वर्षे पुर्ण असावे. मागासवर्गीय उमेदवांना ५ वर्षे शिथीलक्षम राहिल.
२. अर्जासोबत कोणतीही शैक्षणिक कागदपत्रे जोडू नये.
३. उमेदवारांस मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक आहे.
४. लेखी परिक्षेसाठी उमेदवाराला स्वखर्चाने यावे लागेल.
५. निवड झालेल्या उमेदवारांची या विभागातील कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या जिल्हयातील कोणत्याही प्रकल्प कार्यालय / शासकीय वसतिगृह / शासकीय आश्रमशाळेत नियुक्ती दिली जाईल. या विभागाची शासकीय वसतिगृहे / शासकीय आश्रमशाळा निवासी असल्याने उमेदवारास मुख्यालयी राहणे बंधनकारक राहील.
६. अनुसूचित जाती, विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती (ब,क,ड) विशेष मागासवर्ग व इतर मागासवर्गीय उमेदवारांची निवड झाल्यावर सदर उमेदवारांनी सहा महिन्यांच्या आत संबंधीत प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयास जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्याची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

७. अनुसूचित जमातीच्या संवर्गातील उमेदवारांची निवड झाल्यावर सदर उमेदवारांनी नियुक्ती आदेश मिळण्यापुर्वी जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही.

८. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती / भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९.१.२००४ पासून अमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे तत्त्व (क्रिमीलेअर) वि.जा. अ, भ.ज. (ब/क/ड) इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग तसेच महिला या समांतर अरक्षणातील उमेदवारांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे किमान सन माहे मार्च २०१६ अखेरचे या कालावधीतील (नॉन-क्रिमिलेअर) प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे.

९. महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१/मसेआ/२०००/ प्रक्र-४१५/ का-२ दिनांक २५.५.२००१ मधील तरतूदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्तिगट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे माहे मार्च २०१६ अखेरचे या कालावधीतील नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१०. **जाहिरातीत दिलेल्या पदांची संख्या भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर कमी अथवा जास्त होऊ शकते. त्यामुळे सामाजिक व समांतर आरक्षणाच्या पदामध्ये बदल होऊ शकतो.**

११. निवड झालेल्या उमेदवारांना रुजू झाल्याच्या दिनांकापासून किमान १० वर्षापर्यंत विभाग बदलीने अथवा इतर खात्यात विनंती बदलीने जाता येणार नाही.

१२. **अर्जात चुकीच्या किंवा अपूर्ण नोंदी असल्यास व योग्य पात्रताधारक नसल्याचे आढळून आल्यास असा अर्ज विचारात घेतला जाणार नाही .**

१३. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

१४. शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र-आस्था-१००२/प्रक्र ४५/का-१५ दिनांक १०/०८/२००५ अन्वये अपंग उमेदवाराच्या नियुक्ती संबंधात संबंधीत पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि सदर शासन निर्णयातील परिशिष्ठ अ मधील निकष लक्षात घेवून त्याप्रमाणे वैद्यकीय मंडळाने अथवा जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी नियुक्तीसाठी सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (किमान ४० टक्के अपंगत्व असल्याबाबत).

१५. शासन निर्णय वित्त विभाग क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा ४ दि.३१/१०/२००५ अन्वये राज्य शासनाच्या सेवेत दिनांक १/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यासाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू असेल. सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू राहणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार मानधन / वेतन व भत्ते मिळतील.

१६. उमेदवाराने ज्या पदांसाठी अर्ज केला आहे त्या पदासाठी आवश्यक त्या सर्व अर्हता /आरक्षण उमेदवार धारण करित नसल्याचे कोणत्याही टप्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

१७. जाहिरातीमधील सर्व पदांसाठी पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेचा दिनांक, वेळ व ठिकाण ऑनलाईन प्रवेश पत्राव्दारे कळविण्यांत येईल.

१८. उमेदवारांच्या पद निहाय लेखी परीक्षा एकाच दिवशी घेण्यात येईल. पद क्रमांक १ ते ५ सकाळी व पद क्रमांक ६ साठी परिक्षा दुपारच्या वेळेस घेण्यात येईल.

१९. शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र-आस्था-२०१२/प्रक्र ८८/का-१५ दिनांक १६/०४/२०१२ अन्वये गठित केलेल्या निवड समितीमार्फत पात्रता धारकांची निवड करण्यात येईल.

२०. पात्र ठरलेल्या उमेदवारांना अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडुन नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२१. महिला उमेदवारांचे लग्नानंतर नावांत बदल असल्यास तशी राजपत्राची प्रत सादर करावी लागेल.

२२. अपात्र ठरलेल्या अर्जाचे परिक्षा शुल्क परत केले जाणार नाही.

२३. जाहिरातीत दर्शविलेले आरक्षण हे विषयनिहाय नसून संवर्गनिहाय (पदनिहाय) आहे.

२४. उमेदवारांने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये प्रतिज्ञापत्र दयावे लागेल.

२५. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील ८६५ गावामधील मराठी भाषीक उमेदवारांना शासन परिपत्रक क्र-मकसी-१००७/प्रक्र ३६/का-३६ दिनांक १०/७/२००८ मधील तरतूदी लागु राहतील.

२६. शासकीय नोकर भरतीला लागु असणारे सर्व नियम या भरतीला लागु राहतील.

२७. उमेवाराने जाहिरातीतील पदासाठी विहित अर्हता धारण केली म्हणजे त्यास लेखी परिक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहित अर्हता धारण करीत नाही असे आढळल्यास, गैरवर्तन करतांना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करतांना आढळल्यास त्यांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.

२८. भरती प्रक्रियेबाबतची website वरील अपडेट चेक करणे ही संबंधित उमेदवारांची संपुर्ण जबाबदारी राहील.

२९. रिक्त पदाच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची तसेच सामाजिक व समांतर आरक्षणात बदल होण्याची शक्यता असल्याने त्याबाबत अर्जदारास कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, सामाजिक व समांतर आरक्षण याबाबत बदल करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे. तसेच संपुर्ण भरती प्रक्रिया रद्द करणे किंवा त्यात अंशत: बदल करणे. याबाबतचे सर्व अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर विभाग, यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती यांनी राखून ठेवले आहेत.

३०. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरित झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचे आरक्षित पदांकरीता व खुल्या पदाकरिता विचार केला जाणार नाही.

३१. उमेदवाराला एकापेक्षा जास्त पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र परिक्षा शुल्क भरावे लागेल. मात्र ज्या पदाकरिता परिक्षेला बसले असाल त्याच पदाच्या निवडीकरिता विचार केला जाईल.

**(टिप- नागपूर विभागाची जाहिरात प्रथमत: प्रसिध्द करण्यांत येत आहे.)**

## परिक्षा शुल्क

### शिक्षकेत्तर संवर्ग पदांसाठी

खुल्या प्रवर्गात अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी रुपये ३००/-

राखीव प्रवर्गात अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी रुपये १५०/-

## अर्ज सादर करण्याची पध्दत

१. प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज ऑनलाईन पध्दतीने दिनांक १८/०८/२०१६ ते ०८/०९/२०१६ पर्यंत स्वीकारण्यात येतील. तसेच ऑनलाईन द्वारे अर्ज डाऊनलोड झाल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून अर्जाची एक प्रत व चलानाची एक प्रत किंवा ऑनलाईन payment केले असल्यास सदर पुरावे **अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर आर टी ओ ऑफीस समोर, अमरावती रोड, गिरीपेठ, नागपूर - ४४००१० या पत्त्यावर डाकेने पाठविण्यात यावी. हस्तेपोहोच अर्ज स्वीकारण्यात येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

२. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड अर्जाची एक प्रत व चलानाची एक प्रत किंवा ऑनलाईन payment केले असल्यास सदर पुरावे http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील. इतर संकेतस्थळाचा वापर वापर केल्यास त्याला कार्यालय व महाऑनलाईन जबाबदार राहणार नाही.

३. उमेदवाराने जाहिरात काळजीपुर्वक वाचावी. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावर "Apply Online" या लिंकवर क्लिक करुन सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर (Register) या बटणावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. आवश्यक माहिती भरल्यानंतर नोंदणी झाल्यावर संगणक प्रणाली उमेदवाराला लॉगिन आयडी आणि पासवर्ड निर्माण करुन उमेदवारास स्क्रिनवर दाखवेल. याची प्रिंट काढण्याची सुविधा आहे.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतांना उमेदवाराने स्वत:च्या अद्यावत फोटो (रुंदी ३.० से.मी x उंची ४.५ से. मी ) व स्वत:ची स्वाक्षरी (रुंदी ३.० से.मी x उंची २.५ से. मी ) आणि ३०० DPI Resolution आणि ५० KB पेक्षा कमी साईज होईल अशा विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. (टिप- फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी) प्रवेश पत्रावर / अर्जावर दुसऱ्याचा फोटो / स्वाक्षरी असल्यास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याच्या सूचना http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील. अर्ज ऑनलाईन अथवा महा ई सेवा केन्द्राद्वारे भरता येईल. महा ऑनलाईन लि. या संस्थेकडून प्रत्येक जिल्ह्यात महा ई सेवा केन्द्र उघडण्यात आलेले आहे. या महा ई सेवा केंन्द्राची यादी http://mahaonline.gov.in किंवा http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

उमेदवाराने यापूर्वी http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर आपले खाते तयार केले नसल्यास उमेदवारास नविन वापर कर्ता नोंदणी वर क्लिक करुन युझर नेम व पासवर्ड तयार करावा लागेल व खाते उघडावे लागेल.

त्यानंतर उमेदवारास "प्रोफाईल निर्मिती" मध्ये जाऊन स्वत:ची संपूर्ण माहिती भरावी लागेल http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर यापुर्वी प्रोफाईल निर्मिती मध्ये जाऊन स्वत:ची माहिती भरलेली असल्यास पुन्हा भरण्याची आवश्यकता नाही. उमेदवार स्वत:ची प्रोफाईल माहिती कधीही अद्यावत करु शकतो.

उमेदवाराने युजर नेम व पासवर्डची नोंद करुन लॉग इन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंक वर क्लिक करावे. त्या कार्यालयांतर्गत उपलब्ध जाहिराती "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या संदेशासह दाखविल्या जातील.

क्लिक केल्यानंतर आपण जाहिरातीत नमुद शैक्षणिक पात्रता / अनुभव / इतर बाबीची पुर्तता करीत असल्यास आपला अर्ज स्विकारल्या जाईल. अन्यथा आपला अर्ज दाखल न होण्याचे कारण दाखविले जाईल.

ज्या उमेदवारांना इंटरनेट द्वारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल. असे उमेदवार महा ई सेवा केन्द्रा मार्फत आपला अर्ज करु शकतात. त्याच वेळी उमेदवारांकडून परिक्षा शुल्क व रुपये २२.९१ ऐवढी रोख रक्कम घेतली जाईल. उमेदवारांना पैसे भरण्याची पावती (Receipt) महा ई सेवा केन्द्रातर्फे देण्यात येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे व पैसे भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे याचा समावेश असले. फोटो / स्वाक्षरी स्कॅन किंवा अर्जाच्या प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केंद्र चालकाकडून आकारली जाईल. स्वत: ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणारे उमेदवार कार्यालयाने निश्चित केलेले परिक्षा शुल्क खालील पध्दतीने भरु शकतील.

<u>परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खालील नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.</u>

१. उमेदवाराने भारतीय स्टेट बँकेत चालान द्वारे, नेट बँकीग, डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड परिक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता खालील पध्दतीचा अवलंब करावा.

२. युजर नेम व पासवर्ड ची नोंद करुन लॉग इन केल्यानंतर मुख्य पृष्ठाच्या वरील भागातील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे. (२) "माझे खाते" या लिंकवर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नांव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "Unpaid" असे लिहीलेले असेल. त्या ठिकाणी "pay Now" अशी लिंक उपलब्ध असेल (३) "pay Now" या लिंकवर क्लिक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) चलनाद्वारे (३) उमेदवारांने क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेट बँकीच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील. उपरोक्त कार्यवाही, अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकापुर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील. (४) उमेदवाराने चलनाद्धारे हा पर्याय निवडल्यास, उपलबध होणाऱ्या चलानाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. (५) चलनाद्धारे शुल्क स्विकारण्याकरिता भारतीय स्टेट बँक उमेवारांकडून परिक्षा शुल्क व्यतिरिक्त नियमानुसार सेवा शुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चलानाद्धारे शुल्क भरतांना परिक्षा शुल्क + बँकेचे सेवा शुल्क भरावे लागतील (६) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकमध्ये चलानाद्धारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणाऱ्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

३. उमेदवाराने प्रिंट चलन (Print Challan) या बटणावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे. या प्रिंट केलेल्या चलनावर उमेदवाराने त्याच्या प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया (State Bank of India) या बँकांच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वरील प्रमाणे नमुद केलेल्या विहित मुदतीच्या आत भरणे आवश्यक राहील व याची एक प्रत उमेदवाराने स्वत:कडे जपून ठेवावी.

**किंवा**

४. उमेदवारांनी इंटरनेट बॅकिंग अथवा क्रेडिट / डेबिट कार्ड द्वारे त्यांच्या प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क विहित मुदतीच्या आत भरावे.

५. फी भरल्यानंतर उमेदवाराने "अर्ज भरा" या लिंकवर क्लिक करुन, आपला उर्वरीत अर्ज भरुन पूर्ण करावा. अर्ज भरताना उमेदवाराने स्वत:चा पासपोर्ट साईजमधील फोटो व सही अपलोड करणे आवश्यक आहे. माहिती पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वत: काढावी व कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करण्यासाठी जतन करुन ठेवावी.

६. विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

७. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना स्वत:चा मोबाईल नंबर व ई-मेल आयडी काळजीपूर्वक भरावा.

<u>इतर महत्वाच्या सूचना</u>

१. परिक्षा केंद्र नागपूर येथे राहील. उमेदवारांचे अर्जाची संख्या जास्त असल्यास नागपूर विभागामधील ६ जिल्ह्याचे ठिकाण निश्चीत करण्यांत येईल किंवा विभागाबाहेर परीक्षा घेण्यात येईल.

२. प्रस्तुत परीक्षेपुर्वी ५ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशपत्र वर नमूद केलेल्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेता येईल. सदर प्रवेशपत्र उमेदवाराने परीक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

३. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने उपरोक्त प्रवेश प्रमाणपत्र आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. (उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन परवाना).

४. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही उमेदवाराने संबंधित बँकांच्या कार्यालयीन वेळेत दिनांक ०९.०९.२०१६ पर्यंत भरणे आवश्यक आहे. शासकीय सुट्टी आल्यास किंवा विपरीत परिस्थितीमध्ये बँकेच्या लगतच्या कार्यालयीन कामकाज दिवस ग्राह्य मानण्यात येईल.

५. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. भरलेल्या परीक्षा शुल्काचा परतावा केला जाणार नाही.

**परीक्षेचे स्वरुप**

| अ.क्र | संवर्ग | परीक्षेसाठीचे गुण | एकुण गुण |
|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा<br>मराठी / इंग्रजी / बुध्दीमता चाचणी / सामान्य ज्ञान | |
| १. | गृहपाल (स्त्री) | १०० प्रश्न (प्रत्येकी २ गुण) | २०० |
| २. | उपलेखापाल | १०० प्रश्न (प्रत्येकी २ गुण) | २०० |
| ३. | अधिक्षक (स्त्री) | १०० प्रश्न (प्रत्येकी २ गुण) | २०० |
| ४. | अधिक्षक (पुरुष) | १०० प्रश्न (प्रत्येकी २ गुण) | २०० |
| ५. | वरिष्ठ लिपीक | १०० प्रश्न | २०० |
| | | **मराठी / इंग्रजी / अंकगणित / सामान्य ज्ञान** | |
| ६. | लिपीक टंकलेखक | १०० प्रश्न | २०० |

६. अ.क्र. १ ते ५ या संवर्गातील पदाच्या लेखी परिक्षेसाठी मराठी, इंग्रजी, बुध्दीमता चाचणी व सामान्य ज्ञान या विषयांवर वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील. सदर अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील पदवी स्तरावरील दर्जाचा असेल तसेच मराठी या विषयावरिल प्रश्न हे महाराष्ट्र राज्यातील उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जासमान राहील.

७. अ.क्र. ६ या संवर्गातील पदाच्या लेखी परिक्षेसाठी मराठी, इंग्रजी, अंकगणित, सामान्य ज्ञान या विषयावर वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील. सदर अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जासमान राहील. प्रश्न बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाचे असतील.

८. उपरोक्त २०० गुणांच्या लेखी परिक्षेसाठी एकत्रितपणे दीड तासांचा कालावधी अनुज्ञेय राहील.

**विशेष सूचना**

१. प्रवेशपत्र उमेदवाराने स्वत: डाऊनलोड करावयाचे आहे.

२. ऑनलाईन स्वरुपात निर्देशीत परीक्षा केंद्रावरच परिक्षा होईल.

३. प्रवेशपत्रावर परीक्षा केंद्र व वेळ नमुद राहील.

४. ऑनलाईन अर्जामध्ये भरलेली माहिती आणि कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यात तफावत असल्यास उमेदवाराची निवड भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा उमेदवाराने मागितलेले सामाजिक / समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिल करणे इत्यादी बदल / सवलती नामंजूर करण्यांत येतील.

५. गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भुत उमेदवारांसाठी कागदपत्रे पडताळणी कार्यक्रम प्रसिध्द केला जाईल. अशा उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सुचनांनुसार त्यांना कागदपत्रे छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास वेळेवर स्वखर्चाने ठरवून दिलेल्या ठिकाणी मुळ कागदपत्रे व साक्षांकित प्रतीसह व्यक्तीश: उपस्थीत राहणे अनिवार्य राहील. सदर दिवशी, विहीत वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्रे छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास, अथवा अपुरे कागदपत्रे सादर केल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल. याबाबत कोणतीही विनंती / तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कागदपत्रे पडताळणी प्रक्रीयेअंती सादर केलेली कोणतीही प्रमाणपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत व नव्याने संधी उपलब्ध करुन दिल्या जाणार नाही. उमेदवाराने पडताळणीच्या वेळेसे विहित शैक्षणिक अर्हता धारण करणारे मुळ कागदपत्रे सादर न केल्यास उमेदवाराचा सदर पदावरील दावा त्याच क्षणी संपुष्टात येईल.

वरीलप्रमाणे गुणवत्ता यादीतील उमेदवारांची कागदपत्रांच्या छाननी नंतर गुणसंख्येच्या आधारे अंतीम निवडयादी तयार केली जाईल.

सदर जाहीराती संदर्भात काही अडचण असल्यास उमेदवार महाऑनलाईनचे दुरध्वनी क्रमांक ०२२-६१३१६४११ या हेल्प लाईनवर संपर्क करु शकतात.

## समांतर आरक्षणाबाबत महत्वाच्या सुचना

| | | |
|---|---|---|
| १. | महिला उमेदवार | महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१/मसेआ/२०००/ प्रक्र-४१५/ का-२ दिनांक २५.५.२००१ मधील तरतूदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्तिगट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे माहे मार्च २०१६ अखेरचे या कालावधीतील नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |

ठिकाण:- नागपूर
दिनांक:- 16/08/2016

अपर आयुक्त,
आदिवासी विकास, नागपूर तथा
अध्यक्ष जिल्हा निवड समिती,
नागपूर.

१) परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रानिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

२) प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास अथवा एखादे प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवाराला त्याचवेळी पुढील प्रक्रियेसाठी अपात्र केले जाईल.

३) उमेदवाराने अर्ज केल्यानंतर निवड प्रक्रियेच्या संदर्भात कोणतेही त्रयस्थ, कार्यालयाचे अधिकारी / कर्मचारी व महाऑनलाईनचे अधिकारी / कर्मचारी यांचेशी व्यक्तीगत किंवा लेखी संपर्क साधू नये तसेच कोणत्याही प्रलोभनाला बळी पडु नये.